# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## दिनांक २७/०८/२०२४ (मंगळवार) सायंकाळ

---

### पो.स्टे. सावनेर हद्दीमधील जुगार अड्डयावर धाड

### —: नागपुर ग्रामीण पोलीसांची कारवाई :—

दिनांक २६/०८/२०२४ रोजी उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय सावनेर येथील स्टाफ पोस्टे सावनेर हद्दीत अवैध धंद्यावर रेड संबंधाने पेट्रोलिंग करीत असतांना मुखबिरद्वारे विश्वसनीय खबर मिळाली की, पोलीस स्टेशन सावनेर हद्दीतील मौजा मच्छीमार्केट सावनेर शिवारातील सार्वजनिक ठिकाणी काही लोक ५२ तासपत्त्यावर पैशाची बाजी लावुन हारजीतचा जुगार खेळत असल्याची गोपनिय माहीती स्टाफ यांना प्राप्त झाले वरून सदर स्टाफ यांनी मौजा मच्छीमार्केट सावनेर शिवारात सापळा रचुन छापा टाकुन **आरोपी नामे— १) उज्वल विकास चव्हारे वय २३ वर्ष रा. सावनेर २) बल्लु नानु शाहु वय ५० वर्ष रा. गुजरखेडी सावनेर ३) अनील सहादेवजी खोब्रागडे वय ५१ वर्ष रा. सावनेर ४) रामदास गोविंदा मोरे वय ५५ वर्ष** हे जुगार खेळतांनी मिळुन आले. एकुण ०४ जुगारी इसम यांना ताब्यात घेवुन त्यांचे ताब्यातुन ५२ तासपत्ते किंमती ३०/— रू व नगदी ९३०/— रू. तसेच ०२ विवो कंपनीचे मोबाईल कींमती १००००/— रू., एसीए कंपनीचा कीपॅड किंमती १०००/—रू. व एक टिव्ही एस ज्युपीटर गाडी क्र. एम. एच—२९/सी ए— ९४७४ किंमती ५००००/— असा एकुण ६१९६०/—रू चा मुददेमाल जप्त करून आरोपीतांविरूध्द पोलीस ठाणे सावनेर येथे कलम १२ महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. रमेश धुमाळ, मा. सहाय्यक पोलीस अधीक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी सावनेर विभाग सावनेर श्री. अनिल म्हस्के सा. यांचे मार्गदर्शनाखाली सफौ संजय, राजेंद्र डहाके, पोहवा महेश डंबारे, नरेश बाटबरई, पोअं पियुष यांनी पार पाडली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर